# महिलांकरिता स्वयंरोजगाराची संधी ही काळाची गरज

**डॉ. अर्चना आ. निखाडे**
स्व. नि.पा.वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय
मुरमाडी/तूप, ता. लाखनी, जि. भंडारा

***सारांश-***

*आजच्या औद्योगिकरणाच्या काळात परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहे. वर्तमानकाळात स्त्रिया शिक्षण घेऊन अर्थाजनाकरिता घराबाहेर पडत आहेत. परंतु वाढत्या बेरोजगारीच्या काळात सर्व गृहिणींना नोकरी किंवा रोजगार मिळेलच असे नाही. म्हणूनच स्वयंरोजगार ही आजच्या काळाची गरज आहे हे आजकालच्या गृहिणींना समजलेले आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्याकरिता त्यांना स्वयंरोजगाराची अत्यंत आवश्यकता भासू लागलेली आहे. आणि यासाठी गृहअर्थशास्त्रातील आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र, मानवविकास, कौटुंबिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन आणि आंतरिक सजावट, विस्तार शिक्षण आणि ग्राहक शिक्षण इत्यादी अशा विविध शाखांच्या शिक्षणाने विद्यार्थिनींना आणि गृहिणींना विविध क्षेत्रातील महत्त्वपूर्ण ज्ञान मिळते आणि त्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग करून त्या लहान किंवा मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावू शकतात. एकंदरीत गृहअर्थशास्त्र शिक्षण घेतलेल्या गृहिणींचे स्वयंरोजगाराच्या मदतीने सक्षमीकरण साधले जाते.*

***कीवर्ड :***

*स्वयंरोजगाराची परिभाषा, वर्तमान काळात स्वयंरोजगाराची आवश्यकता, महिलांकरिता उपलब्ध स्वयंरोजगाराची संधी.*

**प्रस्तावना-**

21 व्या शतकात स्त्रियांनी विकासाच्या दिशेने भरारी घेतलेली आहे. कारण पुरुषाप्रमाणे तिला विकासाची संधी मिळालेली आहे. परंतु वाढत्या बेरोजगारीच्या काळात स्थायी स्वरूपाची नोकरी मिळणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत गृहिणी आपला घर म्हणजेच चूल व मूल या दोन्ही भूमिका व्यवस्थित सांभाळून आपल्या कुटुंबाकरिता आर्थिक मदत करता येईल या विचाराने स्वयंरोजगाराकडे वळताना दिसून येतात.

पंडित नेहरूंजीच्या मते "केवळ पुस्तकी शिक्षण हे आदर्शाच्या प्राप्तीकरिता असफल ठरते. शिक्षणातून व्यक्तिमत्व आणि उत्पादकत्व यांचा विकास झाला पाहिजे, कुटुंब चालविण्याची आपली भागीदारी समर्थपणे पेलण्याची ताकद स्त्रीला शिक्षणातून मिळावयास पाहिजे".

**स्वयंरोजगाराची परिभाषा:-**

"ज्या वेळेस मालाचे उत्पादन व वितरणावर एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण नियंत्रण असते आणि उद्योगाची पूर्ण जबाबदारी त्या व्यक्तीवर असल्यामुळे त्याला आर्थिक उत्पन्न प्राप्त होते, त्याला स्वयंरोजगार असे म्हणतात."

**वर्तमानकाळात स्वयंरोजगाराची आवश्यकता:-**

सध्याच्या काळात कुटुंबात केवळ एका व्यक्तीच्या कमाईवर घराचा खर्च पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे गृहिणीला देखील कुटुंबात आर्थिक सहभागीत्व करावे असे वाटू लागले आहे. परंतु आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे प्रत्येकाला नोकरी मिळणे अशक्य आहे म्हणून स्वयंरोजगार करणे ही वर्तमान काळाची गरज झालेली आहे. स्वयंरोजगार करीत असताना गृहिणीला त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्याची संधी प्राप्त होत असते.

वर्तमानकाळात स्वयंरोजगाराची आवश्यकता निर्माण होण्या मागे अनेक कारणे आहेत. वाढती महागाई, बेरोजगारीचे प्रत्येक क्षेत्रात वाढते प्रमाण, मर्यादित उत्पन्न, जीवनस्तर उंचावण्याची इच्छा, शिक्षण, नोकरीच्या अपुऱ्या संधी, आर्थिक स्वावलंबन, कौशल्य प्रदर्शन, भविष्यकालीन तरतूद इत्यादी या सर्व बाबींचा मेळ घालताना कुटुंबात एकट्या कमावत्या व्यक्तीची तारेवरची कसरत होते. म्हणून कुटुंबातील व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गृहिणीला स्वयंरोजगाराची

आवश्यकता वाटू लागली आणि ती स्वतः आत्मनिर्भर होऊन आत्मसन्मानाने जीवन जगू शकते.

**गृहअर्थशास्त्राचे शिक्षण घेतल्यावर उपलब्ध स्वयंरोजगाराच्या संधीः-**

गृहअर्थशास्त्र हा जीवनाशी सांगड घालणारा उपयोजनशील विषय असल्यामुळे मानवाच्या गरजेची पूर्ती करण्याची क्षमता या विषयात आहे. ह्या विषयात आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र, मानवविकास, कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन, विस्तारशास्त्र या शाखांचा प्रामुख्याने समावेश झालेला आहे. आणि हया शाखांच्या शिक्षणाने गृहिणींना विविध कौशल्य तसेच विविध प्रकारचे ज्ञान तिला प्राप्त होत असते. हया ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग करून ती लहान मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करून अर्थार्जण प्राप्त करू शकते. बदलत्या आवश्यकतेनुसार गृहअर्थशास्त्रात व्यवसाय शिक्षणावर भर दिलेले आढळते. या विषयात पदवी प्राप्त केल्यानंतर ती विद्यार्थिनी किंवा गृहीणी स्वतःचा उद्योग स्थापन करून आर्थिक मिळकत प्राप्त करू शकेल असे शिक्षण तिला दिले जाते. उद्योग किंवा एखादा व्यवसाय सुरू करायचा असल्यास आजकाल बँकांकडून कर्ज प्राप्त होते. गृहअर्थशास्त्र विषयाच्या व्याप्ती नुसार गृहिणींना विविध स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होऊन त्या उत्तम स्वयंरोजगार निवडू शकतील ते खालील प्रमाणे

**१) आहारशास्त्र क्षेत्रातील स्वयंरोजगार संधीः-**

आहारशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी आणि गृहिणींना स्वयंरोजगार करण्याकरिता खूप मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. या ज्ञानाचा उपयोग योग्य तऱ्हेने करणे आवश्यक आहे. आहारशास्त्र आणि पोषणशास्त्राशी संबंधित खालील प्रकारचे उद्योग करून अर्थार्जण करू शकतात.

**अ) तयार खाद्यपदार्थ विकणेः-**

आज गृहिणीचे जीवन अतिशय व्यस्त झालेले आहे. नोकरी आणि घर असा प्रपंच साधत असता स्वतःवरचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने रेडिमेड खाद्यपदार्थ घेण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस सगळीकडे वाढत आहे.

दिवाळी, दसरा किंवा इतर सणावाराला चकली, चिवडा, लाडू, बर्फी, अनारसे, वड्या असे पदार्थ तयार करून विकू शकतात. ऑर्डरनुसार पुरणपोळी, मोदक, करंज्या, गुलाबजाम, खवा, पोळी, रसगुल्ले असे खास पदार्थ तयार करून ग्राहकांपर्यंत पोहोचविले जातात. एवढेच नव्हे तर आजकाल ताजे व गरमागरम पदार्थ करून अल्पावधीत अर्थार्जण प्राप्त करू शकतात.

उदा. समोसा, कोथिंबीर वडी, सांबारवडा, इडली, डोसा, ढोकळा, कटलेट, ब्रेडरोल, ब्रेड पकोडा, भजी, विविध मिक्स पालेभाज्याचा वडा हे पदार्थ आवडीने खाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या स्वयंरोजगारातून सुद्धा गृहिणींना चांगले आर्थिक बळ मिळण्यास मदत होते.

**ब) दीर्घकाळ टिकणाऱ्या पदार्थांचा व्यवसायः-**

विविध प्रकारची लोणची, जॅम, जेली ,सरबते, मुरब्बा, सॉस, टोमॅटो केचप, पापड, चटण्या इत्यादी दीर्घकाळ टिकणारे पदार्थ तयार करून विकता येतात व हया पदार्थांना भरपूर मागणी आहे.

फुड प्रीझर्व्हेरेशन या अन्नशास्त्राचे ज्ञान गृहविज्ञानाच्या विद्यार्थिनींना असते, कारण तो अभ्यासक्रमाचा एक भाग आहे. आणि अलीकडच्या काळात Food Technology फार प्रगत झाली आहे. त्याचप्रमाणे बेकरी पदार्थांचा कोर्स करून केक सारखे पदार्थ तयार करून विकता येतात.

औद्योगिक तंत्रज्ञानातील विकासामुळे आजकाल बऱ्याच पदार्थाची ready mix पदार्थ तयार करता येतात या पदार्थांना मागणीही जास्त असते. उदा. रेडिमेड विविध पीठ उदा. भाजणीचे, इडली, डोसा, मसाले,धने पावडर, सुपारी, वड्याचे तयार मिश्रणाची पावडर, गुलाबजाम मिक्स, साबुदाणा वडा मिक्स, धीरडी मिक्स अशा अनेक खाद्यपदार्थ रेडीमेड पावडर स्वरूपात उपलब्ध करता येतात व विकले जाते तसेच शेवया, पापड, कुरड्या, मूगवड्या तयार करून विकता येतात याकरिता मोठ्या दुकानांची आवश्यकता नसून ते छोट्या जागेतही हा व्यवसाय करता येतो.

**क) डबाबंद पदार्थ विकणेः-**

डबाबंद टिकणारी फळांचे रस, केचप, लोणची इत्यादी यात स्वयंरोजगार म्हणून निवड करता येईल. अशावेळी माहिती लेबल लावणे आवश्यक आहे यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढून

त्या पदार्थांच्या विषयी सर्व माहिती मिळते. 'ग्राहकांचा विश्वास हीच स्वयंरोजगारातील खरी कमाई' हे ब्रीद स्वयंरोजगाराचे आधारभूत तत्व असावयास पाहिजे.

**ड) आहारोपचार पुरवठ्याचा व्यवसाय:-**

आजच्या धकाधकीच्या तणावपूर्ण जीवनामुळे व्यक्तींमध्ये विविध प्रकारचे रोग झालेले आढळतात. रोगावर उपचार करण्याकरिता औषधांबरोबरच आहाराची आवश्यकता असते. विविध दवाखान्यांमध्ये आहार शास्त्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आणि गृहिणी रोगनिवारक आहाराचा पुरवठा करू शकतात.

जसे, कमी मिठाचा आहार, साखर नियंत्रित आहार, सौम्य आहार, पातळ आहार तसेच आजकाल वजन वाढण्यास संबंधित समस्या मोठ्या प्रमाणावर आढळतात. वजन कमी करण्या करिता आहारात काय, कसे, बदल करावे यासोबतच आरोग्यविषयक योगा, व्यायाम ह्यासंबंधी सुद्धा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करून अर्थार्जन करू शकतात.

**२) वस्त्रशास्त्र क्षेत्रातील स्वयंरोजगार संधी:-**

वस्त्र ही मूलभूत गरज असल्यामुळे आकर्षक व नावीन्यपूर्ण कपड्यांना सतत मागणी असते. यासाठी आजच्या काळात वस्त्र उद्योग भरपूर प्रमाणात विकसित झालेला आहे यात विविध प्रकारचे तंतू , बनावटी, परिसज्जा या तंत्रज्ञानामुळे वस्त्रक्षेत्रात प्रचंड उलाढाल होत असल्याची दिसते. वस्त्रशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या गृहिणींनाही उद्योग करून पैशाची प्राप्ती होऊ शकते. वस्त्रावर फार मोठा खर्च होत असतो. गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थिनी व गृहिणी पुढील प्रकारचे व्यवसाय करू शकतात.

**अ) रेडिमेड कपड्यांचे उत्पादन:-**

भारतात विविध प्रकारचे कापड तयार होते त्याची तयार कपडे करून विकू शकतात. आजकाल लहान बालकांपासून तर मोठ्यांपर्यंतच्या सर्व अवस्थेतील व्यक्ती ही रेडिमेड कपडयांचा प्रामुख्याने वापर करीत असल्याचे दिसून येते. गृहअर्थशास्त्र शिक्षण घेतलेली गृहिणी ही बाळाचे कपडे, सलवार-कमीज , शाळेचे गणवेश, स्वेटर अशा सर्वच प्रकारचे कपडे शिवू शकते. रेडिमेड कपड्यांना भारतात तसेच विदेशातही मागणी आहे. उदा. राजस्थानी ड्रेस, घागरा- चोली व अन्य फॅन्सी कपडे, नवीन फॅशन प्रमाणे तयार करून विकणे किंवा आजकाल तर अनेक व्यवसायानुसार ऑफिसमध्येही गणवेश घालण्याच्या पद्धतीमुळे ते गृहिणींना ज्यांना हवे ते त्या प्रकारचे कपडे शिवून देता येते आणि स्वयंरोजगाराची उभारणी करता येते.

**ब) भरतकाम करणे:-**

कपड्यावर भरत काम करून कपड्याचा दर्जा वाढविता येतो. भारतीय भरतकलेचे टाके म्हणजे विविधता आणि सुंदरता याचा संगम आहे. गृहअर्थशास्त्र विषयाचे शिक्षण घेतलेली गृहिणी प्रांतीय भरतकलेचे टाके शिकलेला असल्यामूळे ड्रेस, साड्या, चादरी लहान मुलांच्या कपड्यांवर नाजूक डिझाईन करणे, भरतकामाचे ऑर्डर्स घेणे इत्यादी काम करू शकतात किंवा भरतकाम शिकविण्याचे वर्गही त्या घरी सुरू करून अर्थार्जण करू शकतात.

**क) फॅशन डिझायनिंग:-**

विविधता आणि कौशल्य यांचा मेळ म्हणजे फॅशन डिझाइन होय. व्यक्ती आहे त्यापेक्षा अधिक चांगली स्वतःला प्रेझेन्ट करीत असते. टी.व्ही. या दृकश्राव्य माध्यमांमुळे आजकाल विविध फॅशन्स प्रचलित झालेल्या आहेत. त्याची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्याने डिझायनर्स कपडे तयार करण्याचा उद्योग गृहिणी करू शकतात. व्यक्तिमत्वाची छाप निर्माण करण्यास फॅशन डिझाइन हा स्वयंरोजगार उत्तम ठरतो.

**ड) समारंभासाठी लागणारे कपडे आणि कलाकुसरीच्या वस्तू तयार करणे:-**

लग्न ,मुंज ,बारसे इत्यादी समारंभासाठी विशिष्ट वस्तू व कपडे आवश्यक असतात. हा स्वयंरोजगार उत्तम होऊ शकतो. लहान मुलांचे स्वेटर, लंगोट, झबले, टोपरे अशा आवश्यक वस्तू तयार करून विकल्यास स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत होते.

**इ)वस्त्र छपाई:-**

कोणतेही कापड आकर्षक नाविन्यपूर्ण दिसण्यासाठी त्यावर छपाई केली जाते. वस्त्र छपाईमुळे विविधता आणता येते. गृहअर्थशास्त्र हा विषय शिकलेल्या गृहिणी बांधणी ,बटीक छपाई, स्प्रे पेंटिंग, बारीक प्रिंट, स्टेनसील छपाई इत्यादी पध्दतीने कपड्यांवर छपाई करून देऊ शकतात. या

छपाईच्या विविध पद्धतींचा वापर करून साड्या, चादरी इत्यादी कपडे तयार करून देऊ शकतात.

**३) मानवविकास आणि कौटुंबिक संबंध विषयातील स्वयंरोजगार संधी**:-

आधुनिक युगात विभक्त कुटुंबप्रणाली अस्तित्वात असल्यामुळे मुलांचा योग्य तऱ्हेने विकास होण्याकरिता मातेला जागरूक राहावे लागते. गृहविज्ञान विषयाचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यींनी या दृष्टीने अनेक व्यवसाय करू शकतात.

**अ) पाळणाघर सुरू करणे**:-

लहान मुलांचे संगोपन, त्यांची वाढ व विविध विकास या बद्दलचे ज्ञान या विषयात प्राप्त होत असते. या विद्यार्थिनी आणि गृहिणी पाळणाघर सुरू करू शकतात. आजकाल बऱ्याच स्त्रिया नोकरीकरिता किंवा व्यवसायाकरिता घराबाहेर पडत असल्या कारणाने मुलांना सांभाळण्यासाठी पाळणाघरात ठेवतात. शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींना पाळणाघर चालविल्यास व्यवसाय चांगला चालू शकतो.

**ब) बालवाडी**:-

यात अडीच ते सहा वर्षापर्यंतची मुले बालवाडीत असतात. आणि या वयातील बालकांना उत्तम पद्धतीने शिकविणे आवश्यक असते. गृहअर्थशास्त्र या विषयात मानसशास्त्र पद्धतीने बालकांना शिकविण्याचा अभ्यासक्रम असल्यामुळे विद्यार्थिनी (भावी गृहिणी) योग्य पद्धतीने शिकवू शकतात. गृहअर्थशास्त्र या विषयाच्या गृहिणींना मुलांचे खेळ, खेळणे ,चांगल्या सवयीचे महत्व या सर्व बाबींशी आधारित शिक्षण दिले जाते.

खेळाद्वारे शिक्षण या पद्धतीने जीवनाश्यक बाबी , चांगल्या सवयी, आरोग्याचे ज्ञान, शरीर अवयवाचे परिचय, मित्रभाव विकसित करणे अशा अनेक गोष्टी मुलांना उत्तम पद्धतीने शिकविले जाते. जेणेकरून त्यांचा योग्य विकास होऊ शकतो. अशा अनेक गोष्टींचा अभ्यास गृहिणी करून त्या बालवाडी केंद्र सुरू करून स्वयंरोजगार निर्मिती करू शकतात.

**क) बालसमस्या सोडविण्यासाठी पालकांसाठी सल्ला केंद्र**:-

बालकाची वाढ होत असताना त्यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक असते. परंतु आई-वडील बालकांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही. तेव्हा त्यांच्या वागणुकीत काही समस्या निर्माण होतात या समस्यांवर काय उपाययोजना करता येईल असा प्रश्न सर्वच पालकांना पडतो. ह्या समस्या सोडविण्यासाठी ह्या विषयाचे शिक्षण घेतलेल्या भावी गृहिणी बाल सल्लागार केंद्र सुरू करू शकतात.

**ड) विवाह व कौटुंबिक संबंध सल्ला केंद्र**:-

विवाह आणि कौटुंबिक संबंधासंबंधी गृहअर्थशास्त्र विषयात सविस्तर ज्ञान प्राप्त होते. कुटुंबात निर्माण होणारी भांडणे त्यामुळे आजकाल घटस्फोटाचे प्रमाण बरेच वाढलेले आहेत. या समस्येच्या मुळात जाऊन कारण शोधणे आणि त्यावर उपाय शोधणे इत्यादी समुपदेशकाचे कार्य करण्याच्या भूमिकेतून विवाह आणि कौटुंबिक सल्ला केंद्राची स्थापना करू शकतात.

**४) कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन व आंतरिक सजावट यांतील स्वयंरोजगार संधी**:-

या विषयात साधन संपत्तीचे व्यवस्थापन कलेचे तत्व घटक व सजावटी संबंधित ज्ञान प्राप्त होते. हे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी आणि गृहिणी खालील व्यवसाय चालवू शकतात.

**अ) गृहसजावटकार**:-

आजकाल जागेची टंचाई असल्यामुळे आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या जागेत सर्व सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात. ह्या विषयात गृहसजावट यांचे शिक्षण मिळत असल्याकारणाने गृहसजावटकार म्हणून ह्या विद्यार्थिनी आणि गृहिणी व्यवसाय करू शकतात. तसेच फर्निचर मांडणी , भिंतीबध्द फर्निचर करणे विविध वस्तूंची सजावट कशी करावी याबाबत मार्गदर्शन देऊ शकते.

**ब) पुष्परचनाकार**:-

गृहअर्थशास्त्र ह्या विषयात विविध प्रकारची कृत्रिम फुले तयार करणे, ताज्या व कृत्रिम फुलांचा पुष्पगुच्छ तयार करणे याचे ज्ञान मिळते. आजकाल प्रत्येक प्रसंगी अभिनंदन करण्याकरिता पुष्पगुच्छ यांचा वापर केला जातो. त्यामुळे हा व्यवसाय विद्यार्थिनी करू शकतात. आज-काल 'पुष्परचनांची लायब्ररी' ही नवीन संकल्पना उदयास आली आहे. वेगवेगळया

कृत्रिम पुष्परचना तयार करून त्यांचे संकलन करून लायब्ररीचा व्यवसाय करू शकतात. तसेच कोणत्याही समारंभात फुलांची सजावट, गालिचा तयार करून देणे इत्यादी व्यवसायही या विषयांचे शिक्षण घेतलेल्या गृहिणी करू शकतात व चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

**क) ग्राहक सल्लागार केंद्र:-**

बरेचदा व्यापाऱ्यांकडून ग्राहकांची फसवणूक होत असते, परंतु त्याविषयीचे कायदे आहेत याची ग्राहकांना माहिती नसते. ह्या विषयाच्या शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनींना आणि गृहिणींना ग्राहक कल्याण , ग्राहक उपयोगी सेवा, ग्राहक संरक्षण कायदे इत्यादी विषयाचे ज्ञान असल्यामुळे त्या ग्राहक सल्लागार केंद्र उघडून त्यांना योग्य ती माहिती देऊन मदत करू शकतात.

**५) गृहविज्ञान विस्तार आणि स्वयंरोजगार:-**

आपल्या जवळ गृहअर्थशास्त्र विषयाच्या अंतर्गत विविध शाखांचे जीवनोपयोगी ज्ञान आहे. ते ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविणे हा देखील एक सेवेच्या स्वरूपात स्वयंरोजगार होऊ शकतो. याकरिता महिलांचे शिबिर, कार्यशाळा भरविणे, त्यांच्यात जाणीव जागृकता निर्माण करणे ही कामे करता येते. बहुतेक खेड्यात समस्या सारख्या असतात. अशा वेळी सरपंच किंवा एखादी संस्था असेल ,स्थानिक नेता यांच्याशी संपर्क साधून व्याख्याने, शिबिरे, कार्यशाळा यांचे आयोजन करता येते. याद्वारे सुद्धा उत्तम लाभ देणारा स्वयंरोजगार करू शकतात.

अशाप्रकारे गृहअर्थशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनीकरिता आणि गृहिणीकरिता विविध प्रकारचे स्वयंरोजगार करण्याच्या संधी उपलब्ध असतात. गृहिणींना ज्या विषयात आवड असेल तो व्यवसाय करून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यास सक्षम होतात म्हणजेच आत्मनिर्भर होतात.

**संदर्भ :**


*१. संशोधन पद्धती – प्रदीप आगलावे*

*२. गृह आणि आंतर सजावट- त्रिवेणी फरकांडे, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपुर (दुसरी आवृत्ती जुन २०१५)*

*३. कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन- डॉ.मीना काळेले, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपुर, पिंपळापूरे पब्लिकेशन, महाल नागपुर, जूलै २०१६*

*४. गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट – डॉ. सुनंदा वसू व डॉ रजनी मेहरे*

*५. सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण – डॉ. उज्वला किशोर वैरागडे व विद्युलता प्रदीप मुळे , शशीकांत पिंपळापुरे, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद*